वर्ष २२
अंक १ ला
१५ जुलै १९४८

# समाज स्वास्थ्य



संपादक -
र. धों. कर्वे.
एम. ए.

किंमत
४
आणे

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | कौमार्याचा बडेजाव ... ... ... | १ |
| २. | तिचा प्रियकर ... ... .... ... | ७ |
| ३. | माँतेन्यचे तात्विक विचार : जीवन व मरण ... | १२ |
| ४. | पत्रव्यवहार ... ... ... ... | १६ |
| ५. | शारदेचें पत्र ... ... ... ... | १८ |
| ६. | आर्यसंस्कृतीचे मासले-५ ... ... ... | २३ |



## अजंटांचीं नांवें

मुंबई : श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

पुणें : अल्. के. जोशी, बुकसेलर
डी. अच्. शहा, बुकसेलर.

कोल्हापूरः स्कूल ॲन्ड कॉलेज बुकस्टॉल.

बेळगांवः जे. एम. माणूरकर, खडे बाजार.

अहमदनगरः पी जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ.

निपाणी : के. एस्. बळगुर्गी

कुमठा : आर्. एम्. कामत

नागपूर : सी. सी. ताठे, नवयुग न्यूज अजन्सी.

गोकाक : पी. एम्. शिरगांवकर

सावंतवाडी : विनायक के. वाडकर.


जुलै १९४७ च्या अंकांत ‘ ख ’ या नांवाने जाहिरात देणाऱ्या गृहस्थांचा पत्ता व नांव हरवलीं आहेत. त्यांनी तीं पुन्हा कळवल्यास आमचेकडे आलेलें उत्तर त्यांना पाठवतां येअील.

**संपादक, समाजस्वास्थ्य.**

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# कौमार्याचा बडेजाव

संभोगाच्या अनुभवाच्या पूर्वीच्या स्थितीला कौमार्य म्हणतात आणि वास्तविक हा शब्द स्त्रियांप्रमाणेंच पुरुषांनाही लागू होतो. परंतु पुरुषाने हा अनुभव घेतला आहे की नाही हें समजण्यास कोणताही मार्ग नसल्यामुळे हा शब्द फक्त स्त्रियांनाच लावतात, कारण प्रथमसंभोगापूर्वी योनिमार्गांत अेक पडदा असतो आणि तो प्रथमसंभोगाचे वेळीं सामान्यतः फाटत असल्यामुळे हा पडदा म्हणजे कौमार्याची खूण मानण्याचा प्रघात आहे. हा पडदा योनि-मार्गांत आढळला नाही म्हणजें स्त्री कुमारी नाही असें समजतात, परंतु ही चूक आहे. पुरुषाचें अिंद्रिय पुरेसें मोठें नसल्यास किंवा हा पडदा विशेष चिवट असल्यास तो प्रथमसंभोगाचे वेळींही फाटत नाही आणि अशा वेळींही कधीकधी गर्भधारणा होऊन तो पहिल्या बाळंतपणाचें वेळीं फाटतो. कधीकधी तो अितका चिवट असतो की संभोगच अशक्य होतो आणि तो डाक्तराकडून कापून घ्यावा लागतो.

स्त्री वयांत आल्यावर या पडद्याचा कोणताही उपयोग नसतो आणि मासिक स्रावाला त्याचा अडथळा होतो. तेव्हां तो डाक्तराकडून काढून घेणेंच बरें. किंवा त्याकरतां डाक्तराकडेही जाण्याचें कारण नसतें. तो विशेष चिवट नसल्यास त्यांत प्रथम करांगुलि व नंतर मोठीं बोटें घालून स्त्रीला स्वतःला देखील तो फाडतां येअील, पण यांतली मुख्य अडचण म्हणजे या पडद्याला परंपरेने आलेलें महत्व, कारण ही कौमार्याची खूण आहे ही समजूत फार

जुनी आहे. कित्येक देशांत लग्नानंतर प्रथमसंभोगाचे वेळीं हा पडदा फाटून आलेल्या रक्तांत हातरुमाल भिजवून तो जमलेल्या अिष्टमित्रांना दाखवण्याचा प्रघात आहे. अर्थात् हें रक्त फार थोडें असतें आणि तें कोठून आलें हें समजण्यास कांहीच मार्ग नसल्यामुळे या बाबतींत लोकांची फसवणूकही करतां येअील. अितकेंच नव्हे तर स्त्री अक्षतयोनि ( हा शब्द या पडद्यावरून आलेला आहे ) नसली तरीदेखील तिला प्रत्यक्ष नवऱ्याला सुद्धां या बाबतींत फसवतां येतें.

या पडद्याला जें फाजील महत्व मिळालेलें आहे, तें ब्रह्मचर्याला दिलेल्या महत्वाचाच अेक भाग आहे. शिवाय कित्येक पुरुषांना स्त्रीवर बळजबरी केल्याने समाधान वाटतें आणि स्त्रीला जबरदस्तीने पळवून नेऊन तिच्याशीं लग्न करण्याच्या प्राचीन पद्धतींत देखील याचा थोडासा अंश आहे यांत शंका नाही. हल्लींच्या विवाहांत जरी जबरदस्ती नसली, तरी प्रथमसंभोगाचे वेळीं रक्त आल्यामुळे अशा प्रकारचें समाधान कांहींना लाभतें. अर्थात् हा रानटीपणा आहे, परंतु पुष्कळांच्या अंगीं नकळत थोडाबहुत रानटीपणा असतो आणि त्याचें असें राजरोस समाधान होत असल्यामुळे त्याची त्यांना जाणीवही होत नाही. समंजस माणसांना मात्र या पडद्याचा त्रासच वाटतो आणि कित्येकांना तो प्रथमसमागमाचें वेळीं न फाटल्यामुळें डाक्तराकडे जावें लागल्यास लाज वाटते.

समागमावर पैसे मिळवणाऱ्या वेश्यांना या पडद्याचें पैशाच्या दृष्टीने महत्व बरोबर कळतें आणि अक्षतयोनि वेश्येला किंवा वेश्यावजा अितर स्त्रीला मोठी किंमत येते, कारण ज्यांच्याजवळ पैसे विपुल असतात तें अशा स्त्रीकरतां पाहिजे ती किंमत द्यायला तयार असतात. यांत मोठेंसें नवल नाही, पण कौमार्याला कित्येक ठिकाणी धार्मिक महत्व मिळाल्यामुळे कुमारी स्त्री पवित्र असते ही भावना उत्पन्न झाली. उदाहरणार्थ प्राचीन रोमन लोकांची व्हेस्टा नांवाची देवता असे आणि तिच्या सेवेला कित्येक कुमारिका देवळांत रहात असत. अर्थात् त्या नेहमी कौमार्य राखीतच असत असें नाही, पण अशा

कल्पनेमुळे त्यांना पवित्र मानीत असत. त्यांतही ब्रह्मचर्याला दिलेल्या खोट्या महत्वाचीच पुनरावृत्ति आहे आणि स्त्रीच्या ब्रह्मचर्याला निदान योनिमार्गांतील पडद्याचा पुरावा दाखवतां येतो. पुरुषांचें केवळ त्यांच्या शब्दावर मानायचें असतें. जे किंवा ज्या हें लादलेलें ब्रह्मचर्य कसोशीने पाळतात, त्यांची स्थिति पुष्कळ वेळां वेड लागल्यासारखी होते. अर्थात् हें त्यांच्या कामवासनेच्या कमीअधिक तीव्रतेवर अवलंबून राहतें, पण निसर्गावर मात करण्याचा हा प्रयत्न साहाजिकच पुष्कळ वेळां फसतो.

अर्थात् ब्रह्मचर्याला हें महत्व सर्वत्र दिलेलें नाही, कारण पहिल्या लग्नापूर्वी देखील स्त्री कुमारीच असली पाहिजे हा आग्रह सर्वच देशांत दिसत नाही. याचमुळे जपानांत पित्याला कर्जमुक्त करण्याकरतां मुलीने कित्येक वर्षें वेश्यावृत्ति पतकरून नंतर लग्न करण्याची पद्धत आहे आणि ही हकीकत माहींत असतांही तिच्याशीं लग्न करायला लोक तयार होतात. चीनमध्येंही कित्येक लोक वेश्यागृहांतूनच आपली पत्नी निवडतात आणि विसाव्या शतकांत यूरोपांतही कौमार्याचें महत्व कमी झालें आहे. कित्येक कादंबऱ्यांतील नायिका खरोखर कुमारी असल्या तरी त्या आपल्याला सर्व कांही अनुभवाने माहीत आहे असें भासवतात आणि असें केल्याने आपलें आकर्षण वाढतें असें त्यांना वाटतें.

त्याचप्रमाणें दक्षिण रशियामधील अेका माणसानें स्वतःच्या चरित्रांत असें लिहिलें आहे की जेव्हां त्याला स्वतःपेक्षां जास्त वयाची अेखादी स्त्री हवी असे, तेव्हां तो आपल्याला स्त्रीपुरुषांतल्या भेदाची बिलकुल माहिती नाहीं असें ढोंग करीत असे. त्याचें वय १५ ते २० असतांची ही गोष्ट आहे आणि या ढोंगामुळें त्याला स्त्रीपुरुषभेदाची माहिती प्रत्यक्ष करून देण्याकरतां जास्त वयाच्या स्त्रियांत चढाओढ लागे व तो याचा पुरा फायदा घेअी. हॅवलाक अेलिसनेही आपल्या पुस्तकांत नमूद केलें आहे की पुरुषांना जशा कोंवळ्या वयाच्या मुली हव्याशा वाटतात, तसेंच स्त्रियांनाही कोंवळ्या वयाचे मुलगे पाहिजे असतात असा भरपूर पुरावा आहे.

ही अिच्छा नैसर्गिक आहे, परंतु धार्मिक भावनांमुळें कामवासनेवर जें कृत्रिम दडपण लादलेलें आहे, त्यामुळें नीति आणि चारित्र्य या शब्दांचा अर्थच बदलून गेला आहे. हा अर्थ स्त्री-पुरुषसंबंधांत गुरफटलेला आहे, आणि यापेक्षां कांहीं वेगळा अर्थ त्यांना असूं शकेल ही कल्पनाच पुष्कळांना सुचत नाहीं. नीतीच्या या कल्पनांना क्लीबनीति हेंच नांव योग्य आहे. या नीतीचा आदर्श म्हणजे नपुंसक नसूनही नपुंसकासारखा वागणारा मनुष्य. अर्थात् नपुंसकही याचा फायदा घेऊन आपल्याला चारित्र्य आहे असें भासवतात. असा विपर्यास झाल्यामुळें ही नीति सर्वत्र सारखी नसते. हिंदूंना अेकपत्नीव्रत ही उत्तम नीति वाटते, मुसलमानांना वाटत नाहीं, कारण महंमदानें चार बायका करायला सांगितलें आहे. जपानांत वर सांगितलेल्या प्रकाराला अनीति समजत नाहीत, अितर सुधारलेल्या देशांत अनीति समजतात. खोट्या धार्मिक कल्पनांमुळें हा फरक होतो, बुद्धीचा त्यांत संबंध नसतो.

या कल्पनांचा परिणाम शिक्षणावर झाला आणि प्रजोत्पत्ति कशी होते हें मुलांना सरळ सांगणें क्लीबनीतीमुळें अशक्य झालें. विशेषतः पाश्चात्यांनीं या बाबतींत दंडक घालून दिला. अिंग्लंडांत मुलांना सांगतात की अेक पक्षी नवीन मुलांना आणून सोडतो, फ्रान्समध्यें सांगतात की लहान मुलें कोबीच्या गड्ड्यांत सांपडतात. अर्थात् सर्वच देशांत अशी फसवणूक करीत नाहींत. अशा देशांत मुलें तर्कानें काय तें ठरवतात आणि यामुळें त्यांचा फायदाच होतो. पण जेथें मुलांना मुद्दाम अज्ञानांत ठेवण्याची पद्धत आहे, तेथें प्रजोत्पत्ति कशी होते हें माहीत नसल्यामुळें पुष्कळ मुली फसून गरोदर होतात आणि परमा, गर्मी वगैरेच्या बाबतींतही अज्ञानाची जोपासना केल्यामुळें या रोगांपासून स्वतःचें संरक्षण कसें करावें हेंही कोणाला कळत नाहीं आणि अिंग्लंडांत अजूनही हीच वृत्ति असल्यामुळें या रोगांचा प्रसार झाला आहे.

बुद्धिवादी लोकांची वृत्ति या बाबतींत काय असते ? ज्यांना वाटेल त्यांनी ब्रह्मचर्य पाळावें, याला त्यांचा विरोध नसतो. मात्र ब्रह्मचर्यांत कांहीं पुण्य आहे, किंवा नीति आहे, किंवा तें प्रकृतीच्या दृष्टीनें फायदेशीर असतें,

या थापांवर त्यांचा विश्वास बसत नाही. स्वतःची मतें दुसऱ्यावर लादण्याचा आपल्याला हक्क नाहीं हें जसें ते ओळखतात, त्याचप्रमाणें धार्मिक लोकांनाही आपलीं मतें कोणावर लादण्याचा हक्क नाहीं असा त्यांचा दावा असतो. आपल्या शरीरावर आपला स्वतःचा ताबा असला पाहिजे आणि समागमाचे बाबतींतही दुसऱ्याला त्रास न देतां पाहिजे तें करण्याचा आपला हक्क आहे असें ते प्रतिपादतात. अर्थात् ते स्वतः दुसऱ्याच्या खाजगी भानगडींत पडत नाहींत आणि समागम ही खाजगी बाब आहे हें ते ओळखतात. धार्मिक लोक मात्र अशा समंजस रीतीनें वागत नाहींत. आपल्या मताप्रमाणें दुसऱ्यांनीं वागलें पाहिजे अशी त्यांची अपेक्षा असते. धार्मिक लोकांचा धर्म अितरांना नडतो, हा धर्माचा मोठा धोका आहे आणि नीतिबाज लोकही अशाच रीतीने अितरांना छळतात. ते दुसऱ्याच्या बाबतींत तटस्थ नसतात, त्यांना शक्य तर जबरदस्तीनेही धर्मांतर करायला लावतात, किंवा तें न जमलें तरी दुसऱ्यांना नको असलेला उपदेश करून सतावतात. दुसऱ्याच्या भानगडींत नाक खुपसण्यांत त्यांना कांहीं वावगें दिसत नाहीं, अितकेंच नव्हे तर ते तें आपलें कर्तव्य समजतात.

ब्रह्मचर्याच्या कल्पनेचें पृथक्करण केलें असतां समंजस माणसांना स्पष्ट दिसतें कीं प्राथमिक लोकांच्या भीतीच्या भावनांतून ही कल्पना उत्पन्न झाली आहे आणि तिला शास्त्रीय दृष्ट्या बिलकुल महत्व नाहीं. बुद्धिवादी माणसांना ही कल्पना कधींच पटणार नाहीं. पुण्य आणि पाप या धार्मिक कल्पनांना कोणताही शास्त्रीय आधार नसल्यामुळें ते या बाबतींतही तर्कशुद्ध विचार करूं शकतात आणि प्रकृतीच्या आणि समाजाच्या दृष्टीने जें योग्य दिसेल तेंच शक्य तर करतात, पण पुष्कळ वेळां धार्मिक लोकांचा जुलूम त्यांना समंजसपणाने वागूं देत नाहीं. अशा रीतीनें धार्मिक आणि राजकीय बाबतींत दिसणारा नेहमीचा कट्टरपणा आणि भांडखोरपणा शरीरशास्त्रालाही कसा धाब्यावर बसवतो, याचीं कांहीं उदाहरणें पाहण्यासारखीं आहेत.

१९२७ सालीं पॅरिस शहरांत एका पाद्र्यानें अश्लीलतेच्या सबबीवर

कांहीं विक्रीस ठेवलेलीं मासिकें फाडून टाकलीं. कायद्यानें तीं अश्लील ठरण्यासारखीं नव्हतीं, पण कोर्टांत त्यानें सांगितलें कीं अशी चित्रें म्हणजे विष आहे. अर्थात् त्याला शिक्षा झाली. दुसरें उदाहरण म्हणजे त्याच सालीं बेलग्रेड शहरांत सर्बियाचा युद्धांत जय झाल्याचें प्रतीक म्हणून एका शिल्पकारानें एक तेरा फूट उंचीचा पुरुषाचा नग्न पुतळा तयार केला. हा पुतळा शहराच्या मध्यभागीं उभारायचा होता. धार्मिक पत्रांनीं याविरुद्ध गहजब केला आणि या 'अनैतिक' प्रकाराविरुद्ध चळवळ करण्याकरतां एक समिति नेमली. या पुतळ्याने लोकांची नीति बिघडेल या सबबीवर त्यांनी भर दिला होता. अशाच तऱ्हेनें आणखी एका शहरांतल्या मुर्तिकारानें एका युद्धविषयक स्मारकांत एका दुःखानें विव्हल झालेल्या मातेला तिचा मुलगा सुदैवानें वांचून परत येवून सांवरीत आहे असें दृश्य दाखवलें होतें. हा मुलगा तेथें नग्न दाखवल्यामुळें धार्मिक लोकांनीं विरोध केला व तें स्मारक लांबणीवर पडलें.

रंगभूमीवरील पोषाखाविषयीं असेच प्रकार नेहमी दिसतात. नग्न नृत्य करणारी एक युरोपीय नर्तिका तेथें आली असतां तिला बंदी करावी लागली होती. युरोपांत तिनें नृत्य केलें होतें, परंतु एकानें असे मत दिलें कीं अशा नर्तिकांना चवाठ्यावर चाबकानें फोडून काढलें पाहिजे. धर्मानें हिंसक वृत्ति कशी उत्पन्न होते हें यावरून स्पष्ट दिसतें आणि तरी देखील धार्मिक लोक अहिंसेच्या वल्गना करीत असतात.

या विवेचनावरून हें उघड दिसतें की ब्रह्मचर्याचा बडेजाव खोट्या आध्यात्मिक कल्पनांमुळें झालेला आहे. सुखाचा त्याग केल्याने ईश्वर खुश होतो, ही वेडगळ कल्पना सोडून दिली म्हणजे त्याला बिलकुल महत्व रहात नाही. नीतिबाज लोक नेहमी धर्मबाज असतात, यावरूनही हेंच दिसतें.

क्लीबनीतीचा पायाच अशा रीतीनें ढांसळून पडतो. इंग्लंडसारख्या धर्मबाज देशांतले लोक नीतिबाज असतात यांत नवल नाहीं, पण फ्रेंच लोक धर्माच्या बाबतींतही विचार करणारे असल्यामुळें ते क्लीबनीतीला

मान वांकवीत नाहींत. बुद्धिवादी लोकांना धर्मावर आधारलेले कोणतेही बहिष्कार मान्य होत नाहींत आणि प्रत्येकाला संभोगसुखाचा हक्क आहे असें ते मानतात. क्लीबनीति ही नीतीच नव्हे, दुसऱ्याचें नुकसान करणें म्हणजे अनीति, अशी त्यांची व्याख्या असते आणि यामुळें दुसऱ्याचें नुकसान केल्याशिवाय जसें इतर कोणतेंही सुख भोगण्यांत पाप नाही किंवा अनीति नाही, तसेंच संभोगसुख भोगण्यांतहीं कांही अनीति नाही. ही खाजगी गोष्ट आहे. तिचा नीतीशीं किंवा चारित्र्यांशीं कांहीही संबंध पोंचत नाहीं.

---

# तिचा प्रियकर

लेखक, **स. हृदय**, महाड.

बन्नू येथे मला जाण्याचा योग आला होता आणि तो मी चुकवला नाही. याचें एक महत्तर कारण पण होतें. सातआठ वर्षांपूर्वी माझा भानु गोखले नांवाचा कालेजमित्र मुंबईस मरीन ड्राइव्हवर भेटला होता. तोही फिरायलाच आला होता, बऱ्याच गप्पा झाल्या. आम्ही कालेजांत असतांना तो तारा कुळकर्णी नांवाच्या मुलीच्या प्रेमांत पडला होता, पण तिची प्राप्ति त्याला झाली नव्हती. म्हणून मी त्याला सहज तिची माहिती विचारली. तेव्हां ती सध्या बन्नू येथे डाक्टरीण म्हणून व्यवसाय करीत असल्याचें त्याने मला सांगितलें. तेवढेंच मी ध्यानांत ठेवलें होतें, कारण...कारण...सांगतों पुढें.

माझें बन्नू येथील काम उरकलें. रा. सा. उरळीकरांकडे मी उतरलों होतों, त्यांना मी बोलतां बोलतां तारा कुलकर्णीची माहिती विचारली. ती त्यांची डाक्तर होती, त्यांचा घनदाट परिचयही होता, हें मला कळलें. तिची माझी कालेजमधील ओळख असल्याचें सांगून मी तिला भेटण्याची मनीषा प्रकट करतांच रावसाहेबांना आनंद झाला. सहजसाध्य गोष्ट होती तं.

त्याच दिवशीं सायंकाळीं मी रावसाहेबांच्या मोटारींतून डॉ. तारा कुळकर्णी हिच्याकडे गेलों. तिला पण मोकळीक होती. मला प्रथम तिने ओळखलें नाही, पण कालेजमधील गोष्टी निघतांच "तुम्हाला पाहिल्याचें आठवतें" असें ती म्हणाली. " बरें झालें भेटलां तें. आनंद झाला मला, " असे शिष्टाचाराचे उद्गार पण काढले तिने.

दुसऱ्या दिवशीं रविवार होता. तिने मला जेवायला बोलावलें, मी तिचें तें आमंत्रण स्वीकारलें. तिच्याकडे 'रविवारचें' भोजन असल्यामुळे शाकाहारी रावसाहेबांना तिचें आमत्रंण स्वीकारतां आलें नाहीं. उलट मला माझें आवडीचें भोजन मिळणार म्हणून त्यांना आनंद झाला.

जेवणें झालीं. ताराच्या प्रशस्त दिवाणखान्यांत आम्ही गप्पा मारीत बसलों होतों. अर्थात वीस वर्षांपूर्वीच्या कालेजजीवनाविषयीं आमचें बोलणें निचणें अपरिहार्य होतें. भानु गोखले तिच्यावर प्रेम करीत होता हें तिला माहीत होतें. त्याने तिला अनेक पत्रें लिहून मागणी घातली होती, हें पण तिने कबूल केलें. तिलाही तो आवडत नव्हता असें नाही, पण तिचा डाक्तरीचा अभ्यासक्रम पार पडायचा होता, म्हणून ती लग्नाच्या भानगडींत पडली नाही. तोंवर भानूने तिचा पिच्छा पुरवला असता तर तिने नंतर त्याच्याशीं लग्न पण केलें असतें. पण तो तिच्या नकारांनीं निराश झाला होता. त्याने तिचा नाद सोडला होता नि तीही त्याला विसरून गेली होती.

तिने आपली पुढचीही हकीकत सांगितली. तिने दक्षिण हैदराबादच्या अेका श्रीमंत डाक्तराशीं ( वडिलार्जित अिस्टेटीमुळें ) लग्न केलें होतें, पण पांचसहा वर्षेपर्यंत त्यांचें जमलें नाही, म्हणून तिने स्वतंत्रपणें अितक्या लांब, बन्नूला दवाखाना थाटला होता. ती जरी दाखवीत नव्हती, तरी तिचें आयुष्य दुःखी होतें हें मला तिच्या बोलण्यावरून आणि भानु गोखले विषयींच्या सहानुभूतीच्या उद्गारांवरून कळून आलें होतें. पण मी काय बोलणार ?

मी पण ' मस्त ' जेवणानें जरासा खुषींत होतों. कालेजांत अेकटा

भानु गोखलेच तारावर प्रेम करीत होता असें नसून जवळजवळ आमचा अर्धा वर्ग तिच्या प्रेमांत पडला होता, हे मी सांगतांच ती मनापासून हंसली.

"तुम्ही पण माझ्यावर प्रेम करीत होतां की काय, रमेश?"

"होय, नाहीं कसा म्हणूं?"

"पण तसें दिसलें नाहीं कुठें? एखादें कागदी विमान तरी तुम्ही उडवायचें होतें माझ्यावर!" ती हंसली. मी जरासा बेचैन झालो होतों यांत शंका नाहीं.

"कांहो, काय झालें, रमेश?" तिनें विचारलें.

"कांहीं नाहीं विशेष."

"अहो बोला ना! गंमत म्हणून तर सांगा!"

शेवटीं मानवत्तीला मी बळी पडलों आणि माझ्या प्रेमाची हकीकत तिला तपशीलवार सांगितली. प्रथम मी कॉलेजमध्ये तिला पाहिली तेव्हां गर्भगळितच झालों होतों. मला चैन पडत नव्हतें. पण अशी सौंदर्यवती आपल्याला मिळणें मोठी भाग्याची गोष्ट होती, तशीच ती अशक्यप्राय होती हें मला विचारांतीं दिसून आलें. म्हणून मी तिला पात्र होईन असें कांहींतरी माझें वैशिष्टय तिला दिसावें म्हणून प्रयत्नाला लागलों.

मी होतकरू कवि होतों, चांगल्या कविता मी कॉलेजच्या मासिकांत पाठवल्या, पण ह्या कधीच छापून आल्या नाहींत. मग ताराचें आपल्याकडे–निदान आपल्या नांवाकडे–लक्ष कसें वेधणार? मी तिच्यावर प्रेमाच्या कविता करीत होतोंच, पण तिला त्या पाठवल्या तर ती त्याचा सरळ अर्थ न घेतां आपला उपहास करील, म्हणून पाठवल्या नाहींत, आणि दुसऱ्या एका जबर उद्योगाला लागलों.

लहानपणापासून मी नाटकें पाहिलीं होतीं, थोडीशीं लेखनकला मला अवगत होतीच. त्यावेळीं नाटकांना खूप भाव होता, आणि नाटककाराची कीर्ति पण अफाट होई हें मी पाहिलें होतें. म्हणून मी नाटककार व्हायचें ठरवलें, आणि नाटक पुरें होतांच तें एखाद्या मंडळीला बसवण्यासाठी द्यायचें

असा निश्चय केला. इतकेंच नाहीं तर त्याची एक प्रत ताराकडे स्वतः नेऊन द्यायची आणि तें तिलाच अर्पण करण्याची परवानगी मागायची, म्हणजे कीर्तीबरोबर ताराही वश झाली असती, अशी माझी बालंबाल खात्री होती. तो अत्यंत खात्रीचा आणि मानाचा मार्ग होता यांत शंका नाहीं.

शेक्सपिअरच्या भाषांतरित नाटकांची मी खरेदी केली आणि ' रोमिओ आणि जूलिएट ' हें नाटक नव्या स्वरूपांत भाषांतर करण्याचें मी ठरवलें आणि त्याप्रमाणें कामास लागलों. अशा रीतीनें मीं ताराच्या प्राप्तीच्या ध्येयानें प्रेरित होऊन तिच्यावर सारखा प्रेम करीतच राहिलों. पण नाटक पुरें व्हायला वेळ लागला. पूर्वीच्या कल्पनेप्रमाणें तें सोपें काम नव्हतें. दरम्यान प्रीव्हिअसच्या परीक्षा झाल्या, मी पुन्हा कालेजमध्यें आलों तों तारा कालेज सोडून गेली होती आणि माझें पन्नास टक्के प्रेम तेथेच अस्तंगत झालें.

" मग झालें की नाहीं तें तुमचें नाटक पुरें ? "

" नाहीं. कां ? "

" अजूनही तुम्ही तें मला अर्पण करूं शकाल की ? "

या तिच्या मार्मिक उद्गारानें मी जरा नरमलों तर खराच, पण मी तिला तें दिसूं दिलें नाही. ती इतकी खट्याळ असेल असें मला वाटलें नव्हतें.

" त्यावेळीं मी तें कालेज सोडून बनारस युनिव्हर्सिटीच्या मेडिकल कालेजांत दाखल झालें होतें, " तिनें विषय बदलला.

" तरीसुद्धां भानूचीं तुम्हाला पत्रें येत ? "

" कितीक दिवस येत होतीं. कोणी त्याला माझा पत्ता दिला नकळे ! " तिला भानूच्या प्रेमाची आठवण झालेली स्पष्ट दिसत होती. " कांही प्रेमिक आपलें प्रेम अखेरपर्यंत तडीस लावीत नाहीत, असें कां होतें ? "

मी त्या प्रश्नाचें उत्तर देऊं शकलों नाही. आपलें लग्न भानु गोखलेशीं होतें तर आपण सुखी झालों असतों, असें तिच्या मनांत येऊन गेलेंसें मला वाटलें.

" मग ? किती दिवस तुम्ही माझी मानसिक पूजा केली ? " तिचा विनोद लागट नव्हता.

" मनांत अनेकवार तुमची मूर्ति उभी राही. तुमचा फोटो मिळावा म्हणून मी अनेक प्रयत्न केले, पण मिळाला नाही कोठे . "

" भानूजवळ आहे का माझा फोटो ? " —" नकळे. "

पुढें अिकडच्या तिकडच्या खूप गोष्टी निघाल्या. शेवटीं राजकारणावरही आम्ही चर्चा केली. नंतर तिचा पुस्तकसंग्रह तिने मला दाखवला. निवडक पुस्तकें होती तिने जमवलेलीं. मला पण वाचनाचा नाद आहे, मीही त्यांतील कांही वाचलीं होतीं. त्यांविषयी आमचें बोलणें होतें तोंच दुपारचा चहा टेबलावर येऊन दाखल झाला.

" जा आतां तूं बाजारांत रेशन आणायला, नि मोलकरणीने भांडीं घासलीं नसतील तर घासायला सांग. असा तारानें आपल्या आचाऱ्याला हुकूम केला. तो निघून गेला.

चहा झाल्यावर ताराचा बंगला बघण्यासाठीं मी तिच्याबरोबर फिरलों, वर माडीवरही गेलों. तिनें आपलें शय्यागृह पण मला दाखवण्याचें धाष्टर्य केलें. तेथील कांहीं चित्रें पाहून मला बरें वाटलें नाहीं.

" छान आहे, नाही ? " तिनें विचारलें.

" वा ! छानच आहे. " मीही मामुली उत्तर दिलें.

' चलायचं का ?' ती दरवाजापर्यंत पुढें गेली. मी तिच्या मागोमाग जात होतों, तोंच तिने माझ्याकडे नजर रोखीत त्या खोलीचा दरवाजा हलकेच बंद केला. मी बुचकळ्यांत पडलेला पाहून ती हंसली. कधीही न पाहिलेलें असें तिचें मधुर स्मित होतें तें. तिने माझ्या लोकरीच्या कोटाच्या कालरवर हात टेकला.

" छान आहे हें कापड, मला आवडतें. सूट कां नाही शिवून घेतला याचा ? " तिनें गोड स्वरांत मला विचारलें. मी तिला उत्तर देण्याच्या मनःस्थितींत नव्हतों.

" बसा ना, रमेश. जाऊं थोड्या वेळानें आपण फिरायला. "

तिचा हेतु मी समजून चुकलों होतों. तिने हें वाक्य बोलण्याची जरूरी नव्हती. अितका वेळ मी ताराच्या सहवासांत होतों, पण कालेज-मधील माझी तारुण्यसुलभ वृत्ति आज राहिली नव्हती. म्हणूनच की काय, मी तिच्या शरीराकडे या वेळीं कोणत्याही विशेष दृष्टीनें पाहिलें नव्हतें. अजूनही ती सुंदर होती हें खरें, पण ती जराशी स्थूलच दिसली मला. यापेक्षां माझ्या मनांत दुसरें कांहीच आलें नव्हते. बाप रे ! तिचे ते गुबगुबीत गाल भाग-ओथंबलेल्या मांड्या आणि वक्षमंडळ पाहून माझी वृत्ति उसळली.

काय वाटलें मला, तें आजही सांगतां येणार नाही. मी तडक उठलों, दरवाजा उघडून खालील दिवाणखान्यांत येऊन येरझारा घालूं लागलों. थोड्या वेळाने ताही तेथे आली.

" अय्या ! " मला पहातांच ती उद्गारली आणि दुसऱ्या क्षणींच शरमली. तिला वाटलें असावें मी निघून गेलों असेन. तिचा पडलेला चेहरा पाहून मला तिची दया आली. अितकी कीं मी तिच्यावर अेके काळीं प्रेम केलें होतें याची मला आठवण झाली.

" क्षमा कर हां, तारा ! " असें मी कसेंबसें बोललों, अेक श्वास सोडला आणि तेथून बाहेर पडलों. मात्र तिच्या बंगल्याच्या बागेबाहेर पड-तांच मी अेकदां मागें वळून पाहिलें, तों तारा खिडकींत किंवा कोठेच दिसली नाही मला.

---

# मॉंतेन्यचे तात्विक विचारः जीवन आणि मरण

ग्रीक अितिहासांत अशी गोष्ट दिली आहे की अेक सेनापति लढाअी जिंकून काबीज केलेल्या शहरांत शिरला आणि तेथील अेका पुढाऱ्याला म्हणाला, ' तुम्ही मुकाट्याने शरण आलां नाहीत तर तुमचे हाल कुत्रा खाणार नाही. ' पुढाऱ्याने उत्तर दिलें, ' अरे जा ! जे मरणाला भीत नाहीत, त्यांचे तूं

काय हाल करणार ? ' अशीं आणखी अनेक उदाहरणें देतां येतील, आणि खरें पाहिलें तर आयुष्यांतील अनेक आपत्ति मरणापेक्षाही भयंकर असतात. त्याच शहरांतील अेका मुलाला पकडून नेऊन गुलामाप्रमाणें काम करायला सांगितलें असतां तो म्हणाला, ' मी काम करणार ! आणि स्वातंत्र्य माझ्या हातांत असतांना ! ' अितकें म्हणून त्याने गच्चीवरून खाली उडी घेतली आणि तो तत्काळ मरण पावला. किती जगावें हें शहाणा मनुष्य स्वतः ठरवतो. शक्य तितकें जगलेंच पाहिजे असें त्याला वाटत नाही.

निसर्गाचा आपल्यावर अेक मोठा उपकार म्हणजे आपल्याला पाहिजे तेव्हां मरतां येतें. आपण जन्मलों याला आपला अिलाज नसतो, पण मरण आपल्या हातांत असल्यावर आपण त्याची कां फिकीर करावी ? जन्मायचा मार्ग अेकच असतो, पण मरणाचे मार्ग हजार असतात. पुष्कळ वेळां आपल्याला रहायला पुरेशी जागा मिळत नाही, पण मरायला जागा नाही असें कधीच होत नाही. आणि मरण हें सर्व रोगांवर रामबाण औषध आहे. जीवन पुष्कळ वेळां दुसऱ्याच्या मर्जीवर अवलंबून असतें, मरण आपल्या मर्जीवर असतें.

जगण्याकरतां काय काय प्रकार करावे लागतात ! नाना प्रकारचीं औषधें घ्यावीं लागतात, शस्त्रक्रिया करून अेखादा हात किंवा पाय तोडून घ्यावा लागतो, त्यापेक्षा मरण कितीतरी सोपें असतें. रोग जितका अधिक प्रखर, तितका उपायही अधिक प्रखर करावा लागतो आणि यांत अब्रूचा प्रश्नच येत नाही. आपला स्वतःचा खिसा कापणें हा जसा गुन्हा होत नाहीं, तसाच स्वतःचा जीव घेणें हा देखील गुन्हा नव्हे. अेकदां डायोजिनीजला दुसरा अेक प्रसिद्ध तत्वज्ञ भेटला, त्याला जलोदर झाल्यामुळे मेण्यांत बसून जावें लागत होतें. त्याने डायोजिनीजला विचारलें, ' कुशल आहे ना ? ' तो उत्तरला, ' हो, पण अशा स्थितींत देखील तूं जगतोस, तेव्हां तुझें कुशल कसें होणार ? ' आणि कांही दिवसांनी त्या दुसऱ्याने खरोखरच जीव दिला.

पण याउलट कित्येक असेंही म्हणतात की ज्याने आपल्याला जीव दिला , त्या अीश्वराच्या परवानगीशिवाय जगांतून निघून जाणें योग्य नाही,

कारण आपल्याला जीव देण्यांत त्याचा हेतु आपल्यापुरता नसतो, आपण त्याची आणि देशाची सेवा करावी हा असतो. हें कर्तव्य सोडून जर आपण जीव दिला, तर आपल्याला त्याबद्दल मरणानंतर शिक्षा होतें. दुःखापासून पळून जाणें हा भित्रेपणा आहे, खरें धैर्य म्हणजे जीं जीं संकटें येतील तीं धीराने सोसून आपलें कर्तव्य करीत राहणें. प्लेटोने असें लिहिलें आहे की ज्याला असह्य दुःख झालें नाही, किंवा जगायला लाज वाटेल अशी स्थिति आली नाही, त्याने जीव दिल्यास त्याचा छीथू करणेंच योग्य होअील.

या दोन मतांमुळे अेक अडचण उपस्थित होते की मोठें संकट टाळण्याकरतां जीव देणें योग्य होअील हें जर प्लेटोनेही कबूल केलें आहे, तर मग जीव देण्यास पुरेसें मोठें संकट कोणतें हें कसें ठरवावें? कित्येक वेळां असें घडलें आहे की कित्येक माणसांनीच नव्हे तर कित्येक गटांनी क्षुल्लक कारणाकरतां जीव दिला आहे. प्राचीन काळीं अेकदां कित्येक कुमारिकांनी भराभर स्वतःच्या गळ्याला फास लावून घेण्यास सुरवात केली, आणि ही सांथ थांबवण्याकरतां अधिकाऱ्यांना असा हुकूम काढावा लागला की अशा रीतीने ज्या जीव देतील, त्यांना नागव्या करून त्याच दोरीने गांवभर फरफटत ओढीत न्याव्या. अेका वीराचा पराभव झाल्यावर त्याच्या मित्राने त्याला उपदेश केला की लढाअींत मरण आलें असतें तर बरें होतें, पण तें आलें नाही, म्हणून आतां शत्रूच्या हातीं सांपडण्यांत अर्थ नाही, तूं जीव दे. पण त्याने हा उपदेश मानला नाही. तो म्हणाला, ‘ जीवच द्यायचा असला, तर तो पाहिजे तेव्हां देतां येअील. पण तो शेवटचा उपाय आहे, आशेचा अेक कण तरी जोपर्यंत शिल्लक आहे, तोंपर्यंत मी जीव देणार नाही.’ त्याच्या मित्राने ताबडतोब जीव दिला आणि त्यानेही शेवटीं जीवच दिला, पण शत्रूविरुद्ध शक्य तितकें झगडून नाअिलाज झाल्यावर दिला. आयुष्यांत पुष्कळ वेळां अितक्या चमत्कारिक रीतीने फांसा उलटतो, की आतां बिलकुल आशा नाही हें ठरवणें दुरापास्त होतें. सर्व संकटें कधी कधी अेका क्षणांत नाहीशीं होतात आणि जीव देणें हा मूर्खपणा झाला असता असें सिद्ध होतें. शिकारी

कुत्र्यांच्या जवळजवळ तोंडांत सांपडलेले ससे कधीकधी जिवानिशीं पळून जातात, तसेंच संकटांत सांपडलेल्या माणसांचेंही होतें.

युद्धाच्या प्रसंगीं कित्येकांनी आपल्या बायकांना आणि मुलींना मारून मग लढतां लढतां मरण पतकरलें आहे. तुरुंगांत असतांना दुसऱ्या कोणत्याही मार्गानें जीव देतां येत नाही, अशा वेळीं उपोषण करून कित्येक लोक जीव देतात. बळजबरी टाळण्याकरतां कित्येक स्त्रियांनी जीव दिलेले आहेत. अर्थात् हा मार्ग सर्वांनाच पसंत पडेल असें नाही. अेका फ्रेंच लेखकानें त्याचा निषेध केला आहे. त्यापेक्षा बळजबरी झाली तरी मोठेसें नुकसान नाही असें त्याचें म्हणणें. अेक स्त्री सैनिकांच्या हातांत सांपडली, तेव्हां त्यांनी तिला बरीच दारू पाजून नंतर तिचा मनसोक्त उपयोग केला. ती शुद्धीवर आल्यावर म्हणाली, 'आयुष्यांत अेकदां तरी मला पाप केल्याशिवाय मनसोक्त दारू प्यायला मिळाली.' कारण ती खुषीने प्याली नव्हती असें तिचें म्हणणें. अेका लेखकाने असें म्हटलें आहे की स्त्री नको म्हणत असतां कोणी जबरदस्ती केली, तर तिला बिलकुल पाप लागत नाही. तेव्हां अशा वेळीं जीव देण्याचें कारण नसतें.

रोमन लोकांनी अेका शहराला वेढा दिला असतां त्यांच्याशीं आपली लढण्याची ताकत नाही हें उमजून शहराच्या अधिकाऱ्यांनी अेक मोठी मेजवानी केली आणि तींत शेवटीं सर्वांना विषाचे प्याले दिले, आणि नंतर प्रेतें जाळण्याचीही व्यवस्था करून ठेवली. अर्थात् सर्वच या मेजवानीला गेले नाहीत, पण कायदेमंडळाच्या सत्तावीस सभासदांनी अशा रीतीने जीव दिला. शिकंदराने जेव्हां हिंदुस्थानावर स्वारी केली, तेव्हां अेका शहरांतील लोकांनी सर्वत्र आग लावून दिली आणि बहुतेक लोक त्यांत मेले अशी आख्यायिका आहे. शिकंदराने त्यांना वांचवण्याचे प्रयत्न केले असें म्हणतात. त्याचप्रमाणें रोमन लोकांनी स्पेनवर स्वारी केली, तेव्हां एका शहरांतील लोकांनी सर्व मूल्यवान वस्तु अेकत्र करून त्या ढिगावर बायकामुलांना बसवून तो पेटवून दिला आणि नंतर पन्नास लढवय्या तरुणांनी बाहेर पडून शत्रूवर हल्ला केला

आणि तेही मेले. अशीं आणखीही उदाहरणें आहेत.

कोण कशाकरतां आत्महत्या करील याचा नियम नसतो. कित्येकांना येशू खिस्ताला भेटण्याची घाअी झालेली असते आणि मेल्यावर तो भेटणार अशी त्यांची खात्री असल्यामुळे ते जीव देतात. याला खात्रीने निराशा म्हणतां येणार नाही.

मार्सेल्स येथ असा कायदा होता की ज्याला जीव द्यायची अिच्छा असेल, त्यांनी कारणांसह अेक अर्ज कायदेमंडळाकडे पाठवावा व त्यांनी परवानगी दिल्यास सरकारी खर्चाने तयार केलेलें अेक विशेष प्रकारचें विष त्यांना पुरवीत असत. पण ज्याला जीव द्यायचा असेल तो कायद्याची परवा करीत नाही.

प्लिनी याने अेका देशाची हकीकत दिली आहे की तेथील हवापाणी उत्तम असल्यामुळे येथे रोगाने कोणी मरत नसे, पण बरेंच वय झाल्यावर तेथील लोक सर्व निरवानिरव करून समुद्रांत उडी घेत असत, आणि तेथील अेक कडा या कामाकरतां ठेवलेला होता. जीव देण्यास पुरेशीं कारणें मला दोन वाटतात. अेक दुःख, आणि दुसरें अधिक वाओीट मरण येण्याची भीति.

---

# पत्रव्यवहार

१

१ संततिनियमनापासून स्त्रीला अगर पुरुषाला शारीरिक अगर मानसिक त्रास होतो अगर कसें? २. खेडेगांवांत शक्य होतील (आर्थिक दृष्ट्या) अशीं साधनें आहेत काय? त्यांचा साधारणपणें महिन्याच्या खर्च काय येअील? आपला...

उ. १. योग्य साधनें वापरल्यास शारीरिक त्रास बिलकुल होत नाही. दोघांच्याही संमतीने संततिनियमन केल्यास मानसिक त्रासही होत नाही. मात्र पतिपत्नींपैकी अेकाला मुलें पाहिजे असतील आणि केवळ दुसऱ्याच्या

आग्रहामुळे संततिनियमन होत असेल, तर मात्र मानसिक त्रास होईल. २. खेडेगांवांकरतां वेगळीं साधनें नाहीत. जीं सर्व जगांतील तज्ञांनी यशस्वी ठरवलेलीं आहेत, तींच खेडेगांवांतील माणसांनाही वापरावीं लागतील. रबराच्या पेसरी हल्ली पूर्वींइतक्या चांगल्या मिळत नाहीत आणि सर्व वस्तूंप्रमाणेंच त्यांचीही किंमत वाढलेली आहे. पेसरी (डच कॅप) ला पांच रुपये पडतात. पूर्वीं ती वर्षभर टिकत असे, हल्ली सहा महिने टिकावी. तीबरोबर आणखी जेली ( ही मलमासारखी असते, परंतु तेलकट नसते ) वापरावी लागते. साडेतीन रुपयांची नळी सुमारें २५ वेळां पुरते. पेसरीचा आकार तज्ञांनी ठरवावा लागतो आणि त्याकरतां स्त्रीला तपासावी लागते. ती कशी बसवावी हें कोणालाही शिकतां येईल. **सं.**

२

१. स्त्री किंवा पुरुषांचे गालांचे वरील भागांवर व नाकावर काळे डाग आले असतां त्यावर उपाय काय ? डागांत खाज किंवा आग नसते. २. स्त्रीचे वरील ओठावरील मिसरूड ( बारीक मिशा ) कपड्यानें चोळली असतां काळे डाग पडले. त्यावर उपाय काय ? ३. बाळंतपणानंतर तीनचार महिन्यांतच संभोग केल्यास गर्भसंभव होईल का ? न होण्यास काय कारणें आहेत ? एखादे वेळीं संभोग केल्यास हरकत आहे का ? आपला...

उ. १ तारुण्यांत गालांवर पुटकुळ्या उठतात, त्यांमुळें हे डाग पडत असतात. ते नंतर आपोआप जातात. यापेक्षा कांहीं वेगळें कारण असल्यास डाक्तराचा सल्ला घ्यावा. २. केवळ कपड्याने चोळून काळे डाग पडणें अशक्य दिसतें. कदाचित् खरचटेपर्यंत चोळल्यास डाग पडणें शक्य आहे, पण फार बारीक मिसरूड असल्यास तिच्या वाटेला जाऊं नये. विशेष दिसण्यासारखी असल्यास दररोज वस्तऱ्याने काढावी. विजेचा प्रयोग करून केस कायमचे नाहींसे करतां येतात, परंतु हें तज्ञाचें, आणि म्हणूनच खर्चाचें काम आहे. तें शक्य असेल त्यांनीं करावें. ३. बाळंतपणानंतर केव्हांही गर्भधारणेचा संभव असतो. एका बाळंतपणानंतर दहाच महिन्यांनी दुसरें बाळंतपण

झाल्याचीं उदाहरणें आहेत. म्हणजे बाळंतपणानंतर दुसऱ्याच महिन्याला देखील गर्भ राहूं शकतो. अर्थात् संभोग एखादे वेळीं केल्यानेही गर्भ राहूं शकतो. यापेक्षा दुसरी हरकत नाही. बाळंतपणानंतर तीनचार महिन्यांत स्त्रीची प्रकृति सुधारते, ती नीट सुधारली नसल्यास तीही हरकतच आहे. **सं.**

---

# शारदेचें पत्र

गेल्या महिन्यांत पं. नेहरूंनी उटकामंड येथें जें भाषण केलें त्यांत दिसून येणारा हिंदुस्थानविषयींचा अभिमान कौतुकास्पद आहे, परंतु त्याकरितां, ' हिंदुस्थानची लोकसंख्या तशी कांही फार नाही आणि ज्या जागांत हल्ली वस्तीच नाहीं, त्यांचा विचार केल्यास ती कमीच म्हणावी लागेल ' असलीं हास्यापद विधानें करण्याचें कांहींच कारण नव्हतें. ज्यांना ' वंदे मातरम् ' सारखें काव्य करायचें असेल, त्यांनीं खुशाल वाटेल तें लिहावें, कारण कवींना थापा देण्याची मुभाच असते. पण ज्या देशांत कोठे ना कोठे अवर्षण, महापुर, दुष्काळ, दरवर्षी भेट देतात, त्या भूमीला 'सुजला' आणि ' सुफला ' म्हणण्यांत काय अर्थ आहे? दरवर्षी कोठेतरी उष्णतेमुळें माणसें मरतात, आणि तरीदेखील तिला ' मलयजशीतला ' म्हणायचें ?

पण पं. नेहरूंना सत्याची चाड जास्त पाहिजे होती. लोकसंख्या केव्हां फाजील म्हणावी हा मोठासा कठिण प्रश्न नाहीं, पण यावर देखील लोक वाद करतात. आज जगांतच जगाच्या लोकसंख्येला पुरेसें अन्न उत्पन्न होत नाहीं. अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क, हॉलंड, स्वित्झर्लंड, वगैरे यूरोपांतले बारीक देश सोडले, तर सर्वत्र अन्नाची टंचाई मोठ्या प्रमाणांत आहे. त्यांतल्या त्यांत हिंदुस्थान आणि चीन हे सर्वांत दरिद्री देश आहेत हें जगाला माहीत आहे. अशा स्थितींत पं. नेहरूंचें विधान कोणाला खरें वाटेल ? पुढें आम्ही अन्न जास्त उत्पन्न करूं, या म्हणण्यांत

काय अर्थ आहे? पुढें उत्पन्न होणाऱ्या अन्नाचा आजच्या लोकांना उपयोग नाहीं. आश्वासनांवर कोणीही जगूं शकत नाहीं.

हल्ली बॉम्बे क्रॉनिकलचा संपादक कोण आहे कोणाला माहीत, पण त्याच्या मतानें नेहरूंच्या भाषणाने संततिनियमनाच्या पुरस्कर्त्यांना थप्पड बसली आह आणि हे संपादक महाशय आनंदाने नाचत आहेत. बिचाऱ्याला हेंहि कळत नाहीं की पं. नेहरू कांहीही बोलले तरी शास्त्रीय दृष्ट्या त्याला कांहीं किंमत नाहीं. नेहरूंची सदिच्छा आम्ही गृहीतच धरून चालतों, पण गांधींची गादी आतां नेहरूंना मिळाल्यामुळें ते सर्वज्ञ झाले, आणि ते जें कांहीं बोलतील तें वेदवाक्य मानलें पाहिजे, असें मात्र आम्हाला वाटत नाही, मग या संपादकांसारखे अज्ञ लोक कांहीही म्हणोत. आम्ही त्याला भीक घालीत नाहीं.

आपण केलेल्या नवीन कायद्याचा सर्वत्र निषेध आणि धिक्कार होत असलेला पाहून सरकारने अेक पत्रक काढून, 'अितर प्रांतांतले कायदे कितो अधिक कडक आहेत ते पहा,' असें स्वतःचें समर्थन केलें आहे हें समर्थन जर बरोबर असलें, तर त्या प्रांतांनाही हिटलरकडे किंवा स्टालीनकडे बोट दाखवून तसेंच समर्थन करतां येअील. पग त्या समर्थनाला काय किंमत आहे? दुसऱ्याने दगड मारला, मी तर फक्त वीटच मारली, आणि वीट दगडापेक्षा कितीतरी मऊ नसते का? अशाच प्रकारचें हें समर्थन आहे.

राष्ट्रगीत संपेपर्यंत सिनेमाचे दरवाजे बंद ठेवावे, हा हुकूम आतां सरकारने मागें घेतला आहे. पण नियम करण्यापूर्वींच विचार केला असता तर? आणि तो नुसता मागें घेण्याअैवजी सिनेमा-नाटकांच्या शेवटीं राष्ट्रगीत वाजवूं किंवा म्हणूं नये, असाच कायदा करणें अधिक बरें. राष्ट्रगीत ज्याला म्हणायचें, तें कांहीं विशिष्ट महत्वाच्या प्रसंगींच वाजवलें तर त्याचा अधिक मान आणि महत्व राहील. अिंग्लंडांतले लोक राष्ट्रगीताला अतिशय कंटाळलेले आहेत आणि त्याकरतां अितक्या वेळां उभें रहावें लागणें म्हणजे त्यांना शिक्षाच वाटते, तशी स्थिति आपल्या राष्ट्रगीताची न झालेली बरी.

मला वाटतें राजकारणी माणसांना थापा दिल्याशिवाय राहवतच नाही. गांधींच्या अगदीं अंतरंगांतले शिष्य विनोबाजी भावे अेक मंदिर सर्वांना खुलें करण्याच्या प्रसंगीं म्हणाले, "वैदिक धर्म मनुष्यामनुष्यामध्यें भेद मानीत नाही. अखिल धर्मांची हींच शिकवण आहे." हें शेवटचें वाक्य म्हणजे सपशेल थाप आहे. उदाहरणार्थ क्रिस्ती लोक अितरांना आपल्यापेक्षा तुच्छ लेखतात. त्याचप्रमाणें नुकतेंच अेका मुसलमान पुढाऱ्याने असें स्पष्ट विधान केलेलें आहे की अेखादा मुसलमान कितीही हलक्या प्रतीचा असला तरी केवळ तो मुसलमान असल्यामुळेंच अितर कोणत्याही आणि कितीही श्रेष्ठ दर्जाच्या माणसापेक्षा आपोआपच श्रेष्ठ असतो. आणि हीं केवळ वैयक्तिक मतें नव्हत. क्रिस्ती मनुष्य तेवढा स्वर्गात जातो आणि बाकी सर्व नरकांत जातात, ही त्यांच्या धर्माची शिकवण आहे आणि याच सबबीच्या जोरावर ते सर्व जगभर मिशनरी पाठवून शक्य तितक्या जास्त लोकांना बाटवून त्यांच्याकरतां स्वर्गात जागा मिळवून देण्याची खटपट करीत असतात! त्यांच्या मताने त्यांचे हे जगावर मोठेच उपकार आहेत, मग कोणाला ते उपकार वाटोत की न वाटोत. तेव्हां ही थाप देऊन विनोबांनीं कांय मिळवलें? थापा देतांना सुद्धां कोणत्या थापा पचतील याचा विचार करायला नको का?

कृष्णराव मराठ्यांच्या सोंवळ्या मनोगंडाची फ्रॉअिडच्या मनोविश्लेषण पद्धतीने केलेली मीमांसा परवां नुकतीच वाचली. ती अशी की समाजांतील चालू क्लीबनीतीमुळें कित्येकांना आपल्या नैसर्गिक प्रवृत्ति दाबून ठेवाव्या लागतात आणि त्याची अेक युक्ति म्हणून ते त्याच नैसर्गिक प्रवृत्तींबद्दल अितरांचा जोरजोराने निषेध करूं लागतात. कामुक प्रवृत्तींशीं ज्या गोष्टींचा संबंध असेल, त्या त्यांना भयंकर दिसूं लागतात. हें जाणून बुजून केलेलें ढोंग असतें असें नाही, ते स्वतःची देखील फसवणूक करून घेत असतात. यांत अेक फायदा असा असतो की नग्न चित्रें, स्त्रीपुरुषांचें यूरोपीय पद्धतीचें अेकत्र नृत्य, नाटक–कादंबरी–सीनेमा यांतलीं कमुक वर्णनें किंवा दृश्यें, यांना ते खूप शिव्या देतात, पण अशीं दृश्यें पाहण्याची त्यांची गुप्त आवड त्यांना सहज तृप्त

करतां येते, कारण आपण त्यांचा निषेध करण्याकरतां तीं पाहतों, किंवा वाचतों अशी सोपी सबब त्यांना सांगतां येते. कृष्णराव मराठ्यांना सेन्सर्स बोर्डावर नेमल्यापासून त्यांची चांगलीच सोय झाली आहे. सिनेमांतले सगळे 'अश्लील' भाग त्यांना पहायला मिळतात ( अर्थात् ते म्हणतील ' पहावे लागतात ' ) आणि त्यांचा निषेध केल्याचें पुण्यही लागतें. या युक्तीनें असें दुहेरी काम साधतें.

याचाच आणखी अेक प्रकार म्हणजे कित्येकांच्या डोक्यांत ' कामुकता म्हणजे घाण ' ही समजुत ठाम बसलेली असते आणि यामुळें असे लोक स्वच्छतेच्या नांवाखाली लोकांना सतावून सोडतात. हा प्रकार विशेषतः स्त्रियां-मध्यें दिसतो, कारण क्लीवनीतीचें दडपण स्त्रियांवरच जास्त पडतें. घरांत कोठे धुळीचा कण दिसला की त्यांचा संताप होतो आणि त्यांचें झाडणें, पुसणें, घासणें एकसारखें चालू असतें आणि घरांतल्या सर्व माणसांना त्याचा त्रास होतो . कित्येक स्त्रियांना कारण नसतांना दिवसांतून दहावीस वेळां तरी हात धुतल्याशिवाय बरें वाटत नाहीं हें मी स्वतः पाहिलें आहे. त्यांना वेड्या म्हटलें तर राग येतो, पण हा वेडाचाच एक प्रकार आहे.

मला हें सगळें आठवलें कशावरून, तर नागपूरच्या ' भवितव्य 'मध्यें ' भाष्यकार ' या नांवानें लिहिणाऱ्या लेखकानें ( किंवा लेखिकेनें ) अेका अंकांत मासिकांवरच्या दर्शनी चित्रांवर जें प्रवचन केलें आहे, त्यावरून शृंगार हा जरी रसांचा राजा मानला असला, तरी तो अेकंदरींत वाअीटच, निदान उत्तान शृंगार तर फारच वाअीट, तेव्हां तो निदान मासिकांवरच्या चित्रांत दिसतां कामा नये, असा या लेखकाचा आग्रह आहे. मासिकांवरच्या चित्रांत मला तर कधी उत्तान शृंगार आढळला नाही. आणि शृंगार फक्त रसांच्या यादींत असावा, तो इतरत्र कोठे दिसूं नये, हें लेखकाचें मतही मला कबूल नाही. या मताचें समर्थन कांही केलें तरी लंगडेंच राहणार, तेव्हां त्याला त्यानें अशी पुस्ती जोडली आहे की स्त्रियांचीं चित्रें, निदान कामुक चित्रें,

मासिकांवर घातल्याने स्त्रियांचा उपमर्द होतो, तेव्हां स्त्रियांनी अशा चित्रांचा निषेध केला पाहिजे. मासिकावर देवांचीं चित्रें घातल्यानें त्यांचा उपमर्द होत नाही, रामपंचायतनांत सीता रामाच्या मांडीवर बसलेली असते, पण हें चित्र मासिकावर घातलेलें किंवा दिवाणखान्यांत लावलेलें चालतें, चित्रांच्या प्रदर्शनांत नेहमींच नग्न चित्रें असतात आणि तीं पहायला फक्त पुरुषच जातात असें नाही, चांगल्या प्रतिष्ठित स्त्रिया अशा ठिकाणीं जातात, पण मासिकावर मात्र स्त्रीचें चित्र आलें की सर्व स्त्रियांचा उपमर्द होतो ? या आचरट प्रतिपादनाला काय म्हणावें हेंच मला समजत नाही. कृष्णराव मराठ्यांच्याच मनोगंडाने या लेखकालाही पछाडलें आहे असें दिसतें. अर्थात् हा विषय नवीन नाही आणि यावर असली आचरट मतें पूर्वीही अनेकांनी मांडलीं आहेत. मासिकावर स्त्रीचेंच चित्र असलें पाहिजे, असें मात्र माझें म्हणणें नाही. अितरही चित्रें सुंदर असूं शकतात, पण स्त्रियांच्या चित्रांना हरकत कां घ्यावी हें मात्र मला कळत नाही. वाचकांना त्यांत आकर्षण वाटतें, ही कांही हरकत होऊं शकत नाही आणि अशा वाचकांचा दर्जा हलका आहे असेंही मला वाटत नाही. या नैसर्गिक प्रवृत्ति आहेत. वाचकांत किंवा निदान विकत घेणारांत, पुरुषांची संख्या जास्त असते, अितकाच त्याचा अर्थ आहे आणि त्यांना साहजिकच स्त्रियांचींच चित्रें आवडणार. यांत नांवें ठेवण्यासारखें कांहीं नाही.

ब्राम्हणांना स्वार्थत्याग करण्याचा अव्यवहार्य उपदेश ज्या विद्वानांनी केला आहे, त्यांना समर्पक उत्तर फलटणचे माजी दिवाण श्री. गोडबोले यांनी अेका पुस्तिकेंत दिलें आहे. माझा अेकाच बाबतींत मतभेद आहे. दिवाण बहादुर जगताप म्हणतात, सर्व महाराष्ट्रीयांनी 'मराठा' ही जात सांगावी. गोडबोले म्हणतात, हें ठीक आहे, पण 'मराठा' हा शब्द जातिवाचक न समजतां प्रांतवाचक समजावा. पण ज्या शब्दाने आज जातीचाच बोध होतो, तो प्रांतवाचक समजावा म्हणून काय उपयोग? त्याकरतां मला असें वाटतें की आपण अशा अर्थाने चिनी, पंजाबी, बंगाली, गुजराथी, हे अीका-

रांत शब्द जसे नेहमी वापरतों, त्याचप्रमाणें 'मराठी' हा शब्द रूढ करावा. हा भाषावाचक आहे हें खरें, पण वर दिलेले सगळे शब्द तसेच आहेत आणि अिंग्लिश, फ्रेंच, वगैरे शब्दही असेच दुहेरी अर्थाचे आहेत, तेव्हां ती अडचण नाही आणि 'मराठी' या शब्दाने जातीचा बोध होत नाही हा महत्वाचा गुण आहे.

तुझी शारदा

---

# आर्यसंस्कृतीचे मासले—५

हिंदुधर्मांतून बंड करून बाहेर निघालेला जो गौतमबुद्ध, त्याला हिंदुनीं विष्णूचा नववा अवतार बनवला. खरें पाहिलें तर बुद्धाला अीश्वराचें अस्तित्वही मान्य नव्हतें, पण त्याचें महत्व जेव्हां अतिशय वाढलें, तेव्हां कांहींतरी युक्ति करून हा आमचाच आहे असें ठरविण्याची ही रीत होती. त्याचप्रमाणें क्रिस्ती आणि महंमदी या धर्मांना देखील गौणपणा आणण्याकरतां या दोन्हीं धर्मांना मान्य असलेली जी बायबलांतील जगाच्या उत्पत्तीची कथा, तिचेंही विकृत स्वरूप भविष्यपुराणांत दिलें आहे. पुढील उतारा चित्रावशास्त्र्यांच्या प्राचीन चरित्रकोशांतून घेतला आहे. कोशांत 'अदम' हें नांव पहा.

"अदम हा म्लेच्छधर्म वाढवण्याकरतां विष्णूच्या शरीरमलापासून उत्पन्न झालेल्या जोडप्यापैकी पुरुष. (मुसलमान याला आदम म्हणतात, आणि 'आदमी' हा शद्ब त्यापासून बनलेला आहे. र. धों. क.) प्रदान-नगराच्या पूर्वभागी अीश्वराने अेक महावन निर्माण केलें. तें चार कोस दीर्घ होतें. अेकदां पापवृक्षाच्या खालीं जाऊन हा बसला असतां यास पत्नीची भेट घेण्याची अिच्छा झाली. तेव्हां कलीने सर्पाचें रूप घेऊन याला फसवलें. अदमने फळ भक्षण करून उंबराच्या पानांवर निर्वाह केला. दोघेंही वायुभक्षण करीत. नंतर यांच्यापासून पुत्र झाले, ते सर्व म्लेच्छ झाले."

या गोष्टीचा धड अर्थही समजत नाही. बायबलांतल्या ज्ञानवृक्षाला येथे पापवृक्ष बनवला आहे. या वृक्षाचें फळ खाऊं नको, अशी अीश्वराची आज्ञा होती, असें बायबलांत आहे. तेथें कलीच्या अेवजीं सैतान आहे, त्यानें सर्पाचें रूप घेऊन आदमची स्त्री 'अीव्ह' हिला भूल पाडून तें फळ खायला सांगितलें आणि तिनें आदमचेंही मन वळवलें. हें फळ खाल्यावर दोघांनाही कामवासना झाली. ईश्वराला हे कळल्यावर त्याने त्या दोघांना वनांतून हांकून दिलें आणि तुला मुलें होतांना अत्यंत वेदना होतील असा अीव्हला शाप दिला. या दोघांपासून सर्व मानवजाति निर्माण झाली अशी कल्पना आहे, पण याचा अर्थ 'या दोघांच्या मुलांमुलींचें आपआपसांत संबंध होऊन पुढील पिढी निर्माण झाली' असा होतो. तेव्हां भावाबहिणींच्या संबंधाला हरकत नव्हती. चरित्रकोशांतल्या गोष्टींत फक्त पुत्र म्लच्छ झाले असें सांगितलें आहे, वंशवृद्धि कशी झाली हें सांगितलें नाहीं. विष्णूला म्लेच्छ धर्म वाढवण्याची इच्छा कां व्हावी? किंवा हें जोडपें त्याच्या शरीरमलापासून त्याच्या इच्छेविरूद्ध उत्पन्न झालें? आणि विष्णूला देखील शरीरमल असावा हें आश्चर्यच आहे. मनुष्याचे सर्व शरीरधर्म आणि दोष देवांना देखील असतात असें दिसतें. क्रिस्ती आणि मुसलमानी धर्मांना कमीपणा आणण्याकरतांच ही शरीरमलाची कल्पना काढली आहे हें उघड आहे. हा उपद्व्याप कां?

---

अेका मनुष्याला तीन गोऱ्या मुली झाल्यानंतर अेक काळा मुलगा झाला. त्याला बायकोचा संशय येऊन त्यानें तिला विचारलें की हा मुलगा अेवढा काळा कसा झाला? तिनें सरळ उत्तर दिलें, 'त्याचें कारण हा मुलगा तुझा आहे आणि मुली तुझ्या नाहींत.'

---

## स मा ज स्वा स्थ्य

### वर्गणीची माहिती

हें मासिक दर १५ तारखेला प्रसिद्ध होतें. वार्षिक वर्गणी तीन रुपये, व्ही. पी. ने सवातीन. पोर्तुगीज प्रांतांत किंवा परदेशीं व्ही. पी. नाही. हिंदुस्थानाबाहेर साडेतीन रुपये किंवा पांच शिलिंग. मनीऑर्डर केल्यास चार आणे वांचतील. अंक न पोंचल्याची तक्रार महिना संपण्याचे आंत आम्हास मिळाली पाहिजे. पुणें येथील ग्राहकांनी ६९-१, लॉ कॉलेज रोड, येरंडवणें, येथें वर्गणी भरल्यास चालेल.

**राअिट अेजन्सी, १३ नवी भटवाडी, मुंबई ४**

## आमचेकडे मिळणारा माल

| | |
|---|---|
| **लॅम्बट डच कॅप**, आकार ५५ ते ७५, प्रत्येकीं | रु. ५ |
| **उभट कॅप** ( देशी ) लहान, मध्यम किंवा मोठी, | रु. १॥ |
| **राअिट कॉंट्रॅसेप्टिव्ह जेली**, | रु. ३॥ |
| **पुरुषांकरतां पिशव्या**, | ४ आणे, ८ आणे, १ रुपया |
| **कषायचूर्ण**, ( योनिमार्ग धुण्याकरतां ) | बाटलीस अडीच रुपये |
| **कामोत्तेजक नंबर १**, (प्रकृतीकरतां) | बाटलीस चार रुपये |
| **राअिटयूब**, ( रोगप्रतिबंधाकरतां ) | १४ आणे |
| **जेलोटयूब** (फ्रेंच, रोगप्रतिबंधाकरतां), २ नळ्यांचे पेटीस | दोन रुपये |

**राअिट अेजन्सी, १३ नवी भटवाडी, मुंबई–४.**

Registered No. B 2289.


राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई, नं. ४.

## प्रो. र. धों. कर्वे, एम. ए. कृत पुस्तकें

१. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु, ट. ख. ६ आणे.

२. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], चौथी आवृत्ति किंमत रु. ४, ट. ख. ७ आणे.

३. संततिनियमन [सचित्र], ९ वी आ. १। रु. ट.ख. २आ.

४. गुप्त रोगांपासून बचाव, ४थी आ. रु १, ट.ख.५आणे.

५. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख,
भाग १ ला [ पहिलीं तीन वर्षें ], खलास आहे.
भाग २ रा [वर्षें ४-५-६], किं. २-०-०, ट.ख.६आ.

६. त्वचेची निगा, किं. ८ आ., ट. ख. ५ आ.

७. गुरुबाजी (नाटक) किं. ८ आ., ट. ख. ५ आणे

८. वेश्याव्यवसाय, किं. २ रु., ट. ख. ६ आ.

९. तेरा गोष्टी, किं. १ रु. ट. ख. ५ आ.

१०. न्यायाचा शोध ( नवीन सामाजिक नाटक ) किंमत १ रु., ट. ख. ५

११. पॅरिसच्या परी, किं. ३ रु., ट. ख. ६ आणे.

## डॉ. के. भा. लेलेकृत

१. ब्राहरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ५आ.

२. मूळव्याध. किं. ४ आ.



मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रेस, (मुंबई) लिमिटेड, ३५, ताडदेव रोड, मुंबई-७

मुद्रक व प्रकाशकः—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट् एजन्सी,
नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, गिरगांव, मुंबइ-४